दै आनंद नगरी (5)

# प्रभाग रचना व आरक्षणावर ८२ आक्षेप दाखल

## शेवटच्या एकाच दिवशी ३८ आक्षेप



नांदेड (प्रतिनिधी)- महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर हरकती आणि सुचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून यावर निवडणुक विभाग १० ऑगस्ट २०१७ पर्यंत या आक्षेपावर सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करणार आहेत.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभागरचना तयार झाली असून प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सुचना नोंदवायच्या असतील त्यांनी दि. ११ ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे असे सांगितले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागातून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरूवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चुक झाल्यामुळे ती दुरूस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते. प्रत्येक प्रभागात किमान १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटल्यामुळे याची सर्वांना सारखाच लाभ झाल्याची भावना समोर आली होती. यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी नगन्य असून सर्वाधिक आक्षेप प्रभागरचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाल्याचे समोर आले आहे.

यामध्ये आक्षेप नोंदविणाऱ्या सर्वात जास्त प्रभागाची तयार करण्यात आलेली व्याप्ती आणि त्यांची हद्द या संदर्भात अधिक आक्षेप दाखल झाले आहेत. विशेषतः यात माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला यांनी त्यांच्या हद्दीबाबतही आक्षेप नोंदविला आहे. विशेषतः आक्षेप नोंदवता अनेकांनी हद्द ही रस्ता, नाली, किंवा ठराविक ठिकाणाहून हद्द तयार करण्यात यावी असा आक्षेप अनेकांनी नोंदविला असल्याचे समोर आले आहे.

दै युगांतर (6)

# मनपाच्या प्रभाग रचनेवर ८२ जणांचे आक्षेप

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर हरकती आणि सुचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून यावर निवडणुक विभाग १० ऑगस्ट २०१७ पर्यंत या आक्षेपावर सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करणार आहेत.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभागरचना तयार झाली असून प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सुचना नोंदवायच्या असतील त्यांनी दि. ११ ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे असे सांगितले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागातून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरुवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चुक झाल्यामुळे ती दुरूस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते. प्रत्येक प्रभागात किमान १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुट यामुळे याचा सर्वांना सारखाच लाभ झाल्याची भावना समोर आली होती. यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी नगन्य असून सर्वाधिक आक्षेप प्रभागरचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये आक्षेप नोंदविणाऱ्या सर्वात जास्त प्रभागाची तयार करण्यात आलेली व्याप्ती आणि त्यांची हद्द या संदर्भात अधिक आक्षेप दाखल झाले आहेत. विशेषतः यात माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला यांनी त्यांच्या हद्दीबाबतही आक्षेप नोंदविला आहे. विशेषतः आक्षेप नोंदवता अनेकांनी हद्द ही रस्ता, नाली, किंवा ठराविक ठिकाणाहून हद्द तयार करण्यात यावी असा आक्षेप अनेकांनी नोंदविला असल्याचे समोर आले आहे.

- नांदेड,प्रतिनिधी

दै पुण्य नगरी (7)

# मनपा प्रभाग रचनेबाबत ८२ आक्षेप

नांदेड/ प्रतिनिधी

नांदेड वाघाळा मनपाच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने नव्या प्रभाग रचना अस्तित्वात येणार असून त्याबाबतचे आक्षेप दाखल करायची मुदत बुधवारी संपली. मनपाच्या एकूण चार क्षेत्रीय कार्यालय व मनपा आयुक्तांच्या कक्षात अशा पाच ठिकाणी हे प्रभाग रचनेचे आक्षेप व हरकती स्वीकारण्यात आल्या. मनपाची निवडणूक ऑक्टोबरपर्यंत होणे अपेक्षित आहेत.

या अनुषंगाने मनपाने प्रभाग आरक्षण सोडत नुकतीच काढली. त्यात काही बदलही झाले. मनपा यंत्रणेने केलेल्या प्रभाग रचनेविषयी आक्षेप व हरकती मागविण्यात आल्या होत्या. बुधवारी, १९ जुलै ही आक्षेप दाखल करायची मुदत होती. एकूण ८२ आक्षेप व हरकती दाखल झाल्या. अ क्षेत्रीय कार्यालयात १, ब मध्ये ३, क मध्ये १ आक्षेप बुधवारी दाखल झाले तर ड मध्ये एकही आक्षेप बुधवारी दाखल झाला नाही. आता याबाबतची सुनावणी लवकरच मनपा आयुक्त गणेश देशमुख यांच्यासमोर होणार आहे,अशी माहिती मनपा सूत्रांनी पुण्यनगरीशी बोलताना दिली.या आक्षेप व हरकतीमध्ये काही चूकाही निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत तर